## राष्ट्रीय छात्र सेना शैक्षणिक वर्ष 2021 - 22 अहवाल

महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना विभागामध्ये यंदाच्या वर्षी सेवेत असलेली छात्रसंख्या :-

| | २ महा. नेव्हल एनसीसी युनिट, रत्नागिरी | | ५८ महा. बटालियन, सिंधुदुर्ग | |
|---|---|---|---|---|
| | विद्यार्थी | विद्यार्थिनी | विद्यार्थी | विद्यार्थिनी |
| प्रथम वर्ष | **०७** | **०९** | **09** | **14** |
| द्वितीय वर्ष | **१६** | **०४** | **--** | **15** |
| तृतीय वर्ष | **१०** | **०४** | **--** | **16** |
| | **५०** | | **५४** | |

1) यंदा एकूण ६३ छातरांनी वार्षिक प्रशिक्षण कॅम्पमध्ये, ०५ छातरांनी MENU-Sailing Expedition मध्ये, तर ०१ छात्र "एक भारत श्रेष्ठ भारत" कॅम्पमध्ये सहभागी होवून त्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली.

2) NCC विभागाकडून आयोजित ऑनलाइन, ऑफलाईन मार्गदर्शनाचा लाभ छात्राना करून देण्यात आला. स्व-विकासाबरोबरच सामाजिक विकास, देशप्रेम याबद्दल सामाजिक माध्यमातून संदेश देऊन वर्षभर या विभागाने कार्य केले.

3) दिनांक 21 जून २०२१ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योगा बद्दल माहिती व प्रात्यक्षिके यांचे व्हिडिओ छात्राना पाठविण्यात आले. छात्रानी आपापल्या घरी योगासने व प्राणयामाची प्रात्यक्षिके करून योग दिन साजरा केला. जिल्हा क्रीडा संचालनालयामार्फत आयोजित कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी ऑनलाइन सहभाग नोंदविला.

4) २५ जुलै २०२१ रोजी एनसीसी छात्रांनी महाविद्यालय परिसरात श्रमदान केले.

5) दिनांक 12 ऑगस्ट रोजी शहीद स्मारक व महाविद्यालय परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज व स्वामी विवेकानंद यांच्या पुतळ्याची स्वच्छता करण्यात आली.

6) 2 ऑक्टोबर राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती व लालबहादूर शास्त्री जयंती निमित्त महाविद्यालय परिसराची व महाविद्यालय परिसरात येणाऱ्या मार्गांची स्वच्छता करण्यात आली. या दोन्ही महात्म्यांच्या

जीवनावर आधारित चलचित्रपटाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांच्या कार्याची ओळख करून देण्यात आली.

7) जागतिक बालिका दिनानिमित्त तालुका विधी प्राधिकरण समिती व पोलीस दक्षता समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्कूटर रॅलीमध्ये विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तेंडोलकर सर यांनी 'बेटी बचाओ बेटी पढाओ' या विषयाबद्दल जागृतीपर मार्गदर्शन केले. पोस्टर प्रदर्शन करून याविषयी जनजागृती करण्यात आली.

8) दिनांक 31 ऑक्टोबर रोजी स्वर्गीय इंदिरा गांधी स्मृती दिन व वल्लभभाई पटेल जयंतीनिमित्त प्रतिमा अभिवादन करण्यात आले व एकता शपथ घेण्यात आली.

9) देवरुख शिक्षण प्रसारक मंडळामार्फत आयोजित 1971 विजय दिवस कार्यक्रमात एनसीसी छात्रानी संचालन करून शहिदांना मानवंदना दिली. या दिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात छात्रानी सहभागी होऊन या दिवसाचा इतिहास समजून घेतला.

10) राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त मतदार शपथ घेण्यात आली. या विषयावरील प्रा. अरविंद कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

11) 'बेटी बचाओ बेटी पढाओ' या विषयाअंतर्गत 9 फेब्रुवारी रोजी आयोजित सायकल रॅलीमध्ये विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. सार्वजनिक ठिकाणी पथनाट्य सादर करून जनजागृती केली.

12) दिनांक 15 फेब्रुवारी रोजी जिल्हा शासकीय रुग्णालयाच्या सहयोगाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. यामध्ये एनसीसी छात्रानी तसेच शिक्षकांनी मिळून ३३ युनिट रक्तदान केले.

13) जागतिक महिला दिनानिमित्त 'राष्ट्रीय छात्र सेनेमधील युवतींची भूमिका' या विषयावर सेमिनार आयोजित करण्यात आला. आरडीसी परेड 2022 मध्ये सहभागी छात्र कु. वैनायकी कुलकर्णी हिचे मुलींची एनसीसी तील भूमिका, आरडीसी परेडकरिता तयारी या विषयावर मार्गदर्शन आयोजित करण्यात आले.

14) याच बरोबर महाराष्ट्र दिन, स्वातंत्र्य दिन व प्रजासत्ताक दिन हे सण उत्साहात साजरे करण्यात आले.

15) या वर्षाकरिता नेव्हल विभागाचे नेतृत्व कॅडेट कॅप्टन मिहीर शिंदे याने तर आर्मी विभागाचे नेतृत्व JUO प्रणिता सावंत हिने केले.

16) तसेच या वर्षीही नेव्हल विभागाचे सब लेफ्टनंट उदय भाटये व आर्मी विभागाच्या केअर टेकर सौ. सानिका समीर भालेकर यांनी व्यवस्थापन पाहिले.